**<u>मोटार अपघात दावा अर्ज क्र. ३०१/२०१८ मधील निशाणी ५२ वरील आदेश.</u>**

(आशालता गायकवाड वि।। भारती ॲक्सा जनरल इन्शुरन्स कं.लि.)

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी निशाणी ४/५ लगत दाखल केलेल्या विमा पॉलीसीच्या छायांकित प्रतीस निशाणी क्रमांक देणेसाठी दाखल केला आहे.

०२. अर्जदाराने असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र.२ विमा कंपनीने त्यांचेतर्फे साक्षीदार क्र.२ म्हणून ऋषभ कोठारी यांचा पुरावा निशाणी ४४ अन्वये नोंदविला आहे. सदरील निशाणी ४४ कडील पुराव्यातील परिच्छेद क्र.४ ते ६ मध्ये अर्जदार यांनी निशाणी ४/५ लगत दाखल केलेली विमा पॉलीसी संदर्भित केली आहे. त्यामुळे सदरील विमा पॉलीसीला निशाणी क्रमांक देणेत यावा.

०३. सामनेवाला क्र.२ यांच्या विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे सादर करुन असे कथन केले आहे की, अर्जदार यांनी सामनेवाला क्र.२ यांच्या साक्षीदारास अभिलेखावरील कोणताही कागद दाखविला नव्हता. सामनेवाला क्र.२ यांना जे कागद पॉलीसी म्हणून दिले त्याबाबतचा उल्लेख सरतपासात असून ते दाखविल्याचा उल्लेख नाही. अर्जदार यांनी जो कागद पॉलीसी म्हणून दाखल केला आहे तो शाबीत केलेला नाही. सबब, सामनेवाला क्र.२ यांची निशाणी ४/५ कडील विमा पॉलीसीच्या छायांकित प्रतीस निशाणी देणेस हरकत असल्याने अर्ज रद्द करणेत यावा.

०४. अर्जदार व सामनेवाला क्र.२ यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, यादी निशाणी ४ सोबत दाखल केलेल्या अ.क्र.१ ते ४ या कागदपत्रांना दिनांक ११.०६.२०२४ रोजी अर्जदार यांनी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्यावर निशाणी क्रमांक देणेत आले असून त्यावेळी निशाणी ४/५ कडील विमा पॉलीसी ही छायांकित प्रत असल्याने निशाणी देणेत आलेली नाही. त्यानंतर सामनेवाला क्र.२ विमा कंपनीने त्यांचेतर्फे साक्षीदार क्र.२ म्हणून ऋषभ कोठारी यांचा पुरावा निशाणी ४४ अन्वये नोंदविला त्यावेळीही सदर विमा पॉलीसीच्या प्रतीस निशाणी क्रमांक देणेत आला नाही.

सामनेवाला क्र.२ विमा कंपनीच्या विधीज्ञांचे असे म्हणणे आहे की, सदरची विमा पॉलीसी ही त्यांच्या विमा कंपनीची नाही. तसेच निशाणी ४/५ लगत दाखल केलेली विमा पॉलीसी ही मुळ प्रत अथवा सत्यप्रत नसून ती छायांकित प्रत असल्याचे दिसून येते.

०५. वरील सर्व बाबींचा विचार करता निशाणी ४/५ लगत दाखल केलेल्या विमा पॉलीसीच्या छायांकित प्रतीस निशाणी देणे उचित वाटत नाही. सबब, अर्जदार यांचा अर्ज नामंजुर करणेत येतो.

ARVIND WAGHMARE

Digitally signed by ARVIND WAGHMARE
Date: 2025.11.05 16:46:32 +0530

( अरविंद शं. वाघमारे )

दिनांकः ०४.११.२०२५ अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
सातारा.